निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक ३२२ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * शनिवार दि.२८ मार्च २०२६ | * पाने-४

# राज्यात लॉकडाऊन लागणार नाही, अफवा पसरवणाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्पष्टोक्ती

**आत्ताच एक्सप्रेस**


**मुंबई –** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशात निर्माण झालेल्या इंधन टंचाईमुळे लॉकडाऊन लागणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. केंद्राने सद्यस्थितीवर भाष्य करताना लॉकडाऊन लागणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे जे लोक अशी अफवा पसरवत आहेत, त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाईल. या प्रकरणी खोटी माहिती फेसबुक, एक्स किंवा इतर कोणत्याही समाज माध्यमावर टाकली किंवा व्हॉट्सएपच्या माध्यमातून फॉरवर्ड केली तरी तो गुन्हा ठरेल, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी नरहरी झिरवाळ व अशोक खरात प्रकरणातही चौकशी अंती ठोस कारवाई करण्याची ग्वाही दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी काही वेळापूर्वी माध्यमांशी संवाद साधला. त्यात त्यांनी पेट्रोल – डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार मानत राज्यातील वेगवेगळ्या प्रश्नांवर भाष्य केले. ते म्हणाले, आखाती देशांतील युद्धामुळे कच्च्या तेलाचे दर वाढले आहे. यामुळे पेट्रोल – डिझेलचे दर वाढण्याची शक्यता होती. पण इंधन दरवाढीचा फटका सामान्य ग्राहकांना बसू नये म्हणून पेट्रोल – डिझेलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १० रुपयांनी कमी करण्यात आले आहे. त्यामुळे आता कच्च्या तेलाच्या वाढलेल्या भावाचा परिणाम सरकारी तेल कंपन्या व भारत सरकार सहन करणार आहे. त्यामुळे सामान्य ग्राहकांना आता अधिकच्या दरात पेट्रोल – डिझेल घ्यावे लागणार नाही.

मी याविषयी भारत सरकार व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. विशेषतः ज्यावेळी आपल्या आजूबाजूंच्या देशांमध्ये जवळपास शटडाऊनची स्थिती ओढावली आहे. पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका आदी देशांतील लोकांनी गॅस व पेट्रोलच्या तुटवड्यामुळे जवळपास कार्यालये व संस्था बंद केल्या आहेत. अशावेळी भारताने अतिशय उत्तम मॅनेजमेंट करून आपल्याकडे पेट्रोल-डिझेलची कोणताही तुटवडा होऊ दिला नाही. घरगुती गॅसची कोणतीही कमतरता होऊ दिली नाही.

मी सर्व लोकांना विनंती करतो की, विनाकारण अफवेच्या आधारावर पेट्रोल – पंपांवर रांगा लावू नका. आपल्याकडे १ महिन्याचा पेट्रोल – डिझेलचा पूर्ण स्टॉक आहे. पण विनाकारण रांगा लावून जास्तीचे पेट्रोल-डिझेल भरून घेतले तर त्यातून मागणी व पुरवठ्यावर ताण निर्माण होतो. कृत्रिम टंचाई निर्माण होते. अशा प्रकारची टंचाई निर्माण होऊ नये म्हणून आपण नेहमी ज्या पद्धतीने पेट्रोल-डिझेल भरतो, तसेच पेट्रोल – डिझेल ग्राहकांनी भरावे, असे फडणवीस म्हणाले.

केंद्राने लॉकडाऊन लागणार नाही हे जाहीर केले आहे. जे लोक अशी अफवा पसरवत आहेत, त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाईल. अशा पद्धतीची खोटी माहिती फ ेसबुक, एक्स किंवा इतर कोणत्याही समाज माध्यमावर टाकणे किंवा अशा



प्रकारच्या खोट्या पोस्ट या व्हॉट्सएपच्या माध्यमातून पुढे पाठवली तरी तो गुन्हा ठरेल. अशा गुन्ह्यांतील प्रत्येकावर फौजदारी कारवाई होऊ शकते. त्यामुळे मी सर्वांना स्पष्टपणे सांगतोय की, खोट्या अफवा पसरवू नका, नाही तर फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी मंत्री नरहरी झिरवाळांच्या व्हायरल व्हिडिओवरही भाष्य केले. नरहरी झिरवळ यांनी माझ्याशी फोनवरून संपर्क साधून हा व्हिडिओ ३-४ व्हिडिओ जोडून चुकीच्या पद्धतीने तयार करण्यात आल्याचे सांगितले आहे. त्यामुळे त्याची चौकशी झाली पाहिजे. मी त्यांना सल्ला दिला आहे की, त्यांनी तत्काळ त्या संदर्भात एक तक्रार दाखल करावी. या व्हिडिओची शहानिशा केली जाईल. एकूण उद्भवलेल्या परिस्थितीची सत्यता पडताळून त्यांच्या पक्षाच्या नेत्या सुनेत्राताई पवार व आम्ही योग्य तो निर्णय करू.

मागच्या काळात जी घटना घडली त्याचे पूर्ण चौकशी झाली. त्याचा संबंध झिरवळापर्यंत आढळला नाही. पण आत्ता जी घटना घडली आहे, जे काही व्हिडिओ समोर आलेत. ते गंभीर आहेत. त्यामुळे त्याची सत्यता पडताळणे अत्यंत गरजेचे आहे. ते जर सत्य असेल तर त्यावर योग्य ती कारवाई होईलच, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी भोंदू अशोक खरात प्रकरणातही व्हिडिओ व्हायरल करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा दिला. भोंदू अशोक खरातचे कुणासोबत फोटो किंवा व्हिडिओ येतात त्यावरून कोणताही निष्कर्ष काढता येत नाही. त्यातील व्यक्तीचा प्रत्यक्ष सहभाग आहे का? हे महत्त्वाचे आहे. त्यात कुणाचा सहभाग असेल तर कारवाई होईल. नसेल तर केवळ फोटो आहे म्हणून कारवाई होणार नाही. पण एक गोष्ट निश्चित आहे की, या प्रकरणात कुणालाही सोडण्याचे कारण नाही. सरकार अतिशय खोलवर जात आहे. अनेक नव्या गोष्टी पुढे येत आहेत.

अजून काही एफआयआर होण्याची शक्यता आहे. काही पीडित अजून पुढे येत आहेत. काही महिला पुढे येत आहेत. आर्थिक फसवणूक झालेल्या व्यक्तीही पुढे येत आहेत. त्यांचेही एफआयआर लवकरच पाहायला मिळतील. या प्रकरणातील पीडित महिलांचे व्हिडिओ काही लोकांनी सोशल मीडिया साईटवर अपलोड केलेत. ते आम्ही काढून टाकलेत. पण ज्या – ज्या लोकांनी हे व्हिडिओ सोशल मीडिया साईटवर अपलोड केलेत, त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाईल. पीडितांना पूर्ण संरक्षण देण्यात आले आहे. यापुढेही ज्या महिला पुढे येतील त्यांना संरक्षण दिले जाईल. हे संरक्षण गोपनियतेचे आहे. काही जण ही गोपनियता भंग करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांना फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागेल, असे फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील सुंदोपसुंदी विशेषतः आदित्य ठाकरे व संजय राऊत यांच्यातील कथित वादावरही भाष्य केले. संजय राऊत यांचा पक्ष आता एवढा छोटा झाला आहे की, तिथे काय चालते त्याकडे लक्ष देण्यासाठी माझ्याकडे वेळ नाही. त्यामुळे ते आपसात भांडो, मारामाऱ्या करो, एकमेकांच्या झिंज्या उपटो, एकमेकांचे कॉलर पकडो, त्यांचे त्यांना लखलाभ. आम्हाला महाराष्ट्र चालवायचा आहे, असे ते म्हणाले.

# मिनाब शाळेवरील हल्ला ही तांत्रिक चूक नाही, तर १७५ निष्पापांची नियोजित कत्तल; इराणचा अमेरिका आणि इस्त्रायलवर आरोप

**आत्ताच एक्सप्रेस**

**तेहरान –** इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या भीषण युद्धाला आज, २७ मार्च रोजी एक महिना पूर्ण झाला आहे. या पार्श्वभूमीवर इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेत व्हिडिओद्वारे संबोधित करताना अमेरिका आणि इस्त्रायलवर 'युद्ध गुन्हे' केल्याचा गंभीर आरोप केला आहे. दक्षिण इराणमधील मिनाब शहरातील शाळेवर झालेला हल्ला हा 'नियोजित' आणि 'मानवतेविरुद्धचा गुन्हा' असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले.

युद्धाच्या पहिल्याच दिवशी, म्हणजेच २८ फ ेब्रुवारी रोजी दक्षिण इराणच्या मिनाब शहरातील 'शजराह तय्यबेह' प्राथमिक शाळेवर भीषण बॉम्बफ ेक झाली होती. या हल्ल्यात १७५ हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांचा मृत्यू झाला. अराघची यांनी या घटनेचे वर्णन 'टप्प्याटप्प्याने केलेला नियोजित हल्ला' असे केले आहे. ''ज्या वेळी अमेरिकेकडे जगातील सर्वात प्रगत युद्ध तंत्रज्ञान आणि अचूक लष्करी डेटा प्रणाली असल्याचा दावा केला जातो, त्या वेळी शाळेवरील हल्ला चुकून झाला, यावर कोणीही विश्वास ठेवू शकत नाही,'' असे अराघची म्हणाले.

न्यूयॉर्क टाइम्सच्या अहवालानुसार, अमेरिकेच्या लष्करी चौकशीत असे समोर आले होते की, जुनाट माहितीमुळे अमेरिकेचे एक 'टोमाहॉक क्रूझ क्षेपणास्त्र' चुकीने शाळेवर पडले. मात्र, इराणने हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला आहे. अराघची यांच्या मते, अमेरिकेची ही विधाने केवळ स्वतःच्या जबाबदारीतून पळ काढण्याचा प्रयत्न आहेत. ''या अत्याचाराचे समर्थन केले जाऊ शकत नाही आणि त्याकडे जगाने मौन बाळगून पाहता कामा नये,'' असा इशारा त्यांनी दिला.

या हल्ल्याचा सर्वांनी निःसंदिग्ध निषेध करावा आणि दोषींना कडक शिक्षा व्हावी, अशी मागणी इराणने केली आहे. हा हल्ला केवळ एक 'चुकीचा अंदाज' नसून जाणूनबुजून केलेली कत्तल असल्याचा पुनरुच्चार इराणने केला आहे. युद्धाच्या एका महिन्यानंतरही मिनाबमधील त्या शाळेच्या विदारक दृश्यांच्या जखमा अजूनही ताज्या आहेत.

# भोंदू अशोक खरातला ३९ आमदार भेटले; मात्र मलाच लक्ष्य केले जात आहे!-दीपक केसरकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**राहाता –** महिला लैंगिक शोषणाच्या आरोपाखाली अटक असलेला भोंदूबाबा अशोक खरात याच्या ईशान्येश्वर मंदिरात मी आता कधीही जाणार नाही. ईशान्येश्वर मंदिराच्या विश्वस्तांची देखील चौकशी व्हायला हवी, अशी मागणी माजी मंत्री दीपक केसरकर यांनी शिर्डीत प्रसारमाध्यमांशी बोलतांना केली. जवळजवळ ३९ आमदार खरातला भेटून गेले, मग मलाच का लक्ष्य केले जात आहे, असा प्रश्न केसरकर यांनी उपस्थित केला.

श्रीरामनवमी उत्सवाच्या निमित्ताने माजीमंत्री दीपक केसरकर यांनी शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यानंतर प्रसारमाध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना केसरकर म्हणाले, भोंदू खरातच्या दुष्कृत्याबाबत माहित नव्हते, मी धार्मिक असल्याने त्या मंदिरात गेलो. खरातने मंदिराच्या आडून केलेल कृत्य निंदनीय आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आणि मी मंत्री असताना त्या मंदिरात दर्शनासाठी गेलो होतो. त्यांनाही या भोंदूची कल्पना नव्हती.

मी देवभक्त आहे. मी न चुकता शिर्डीला येतो. शिर्डीला येण्याच्या वाटेवर ईशान्येश्वर मंदिर आहे. मी लहान असल्यापासून दर सोमवारी शिव मंदिरात जातो. शिर्डीला आल्यानंतर कुठल्या शिव मंदिरात जायचे? तर मग मी ईशान्येश्वर मंदिरात जाणे झाले. त्या निमित्ताने खरातशी ओळख झाली. त्यांच्या कुठल्याही कृत्यामध्ये माझा सहभाग नाही. त्याला वाचवण्यासाठी माझा एखादा फोन गेला असेल, तर मी दोषी आहे. पण त्याच्याकडून जे चुकीचं कृत्य घडलेलं आहे, त्याची शिक्षा त्याला झाली पाहिजे, ही माझी स्पष्ट भूमिका आहे. खरातने ज्योतिष शास्त्र बदनाम केले आहे, असेही स्पष्टीकरण केसरकर यांनी दिले.

माझ्या विरोधात राजकीय षडयंत्र रचले जात आहे. संजय राऊत काहीही बोलतात, त्यांना देखील परिवार आहे. संजय राऊत ठाकरेंचे प्रवक्ते आणि मधील काळात मी शिवसेना शिंदे गटाचा प्रवक्ता होतो. त्याचा कदाचित ते सूड उगवत विधाने करीत असल्याचा आरोप केसरकर यांनी राऊत यांच्यावर केला.

भोंदू खरातमुळे अनेक राजकीय नेत्यांच्या प्रतिमा मलिन होत आहेत. ३९ नेत्यांचे खरातबरोबर छायाचित्र आहेत, पण संजय राऊत मलाच का टारगेट करीत आहेत, असा प्रश्न केसरकर यांनी यावेळी उपस्थित केला. ईशान्येश्वर ट्रस्टच्या विश्वस्तांची 'एसआयटी'कडून चौकशी व्हावी व भोंदू खरातला कठोरात कठोर शिक्षा होऊन पिडीतांना न्याय मिळायला हवा, अशी अपेक्षा केसरकर यांनी व्यक्त केली.

अशोक खरात या भोंदूबाबत जराही कल्पना कशी आली नाही? याबद्दल विचारले असता केसरकर म्हणाले की, तेच दुर्दैव आहे, की मी मंत्री असताना देखील तेथे येत होतो. त्यावेळी माझ्या बरोबर पोलीस असत, पोलिसांनाही या गोष्टीची कल्पना नव्हती, नाही तर त्यांनी मला सांगितले असते किंवा त्यांच्याबरोबर असलेल्या त्यांच्या काही भक्तांमध्ये अनेक शिक्षक होते, ज्यांच्यासाठी मी खूप काम केले आहे. ते नेहमी आम्हाला सांगायचे की, तुम्ही शिक्षकांसाठी जेवढं काम केले तेवढे कुठल्याच शिक्षण मंत्र्यांनी केले नाही. मग त्यांना जर या गोष्टीची कल्पना असती तर त्यांनी आम्हाला सावध केले असते, असे केसरकर म्हणाले. खरातच्या व्यक्तिगत जीवनाबद्दल आम्हाला कोणालाच काही माहिती नाही. ईशान्येश्वराच्या भक्तीपोटी त्यांची ओळख झाली. ओळख झाल्याचा जर छायाचित्र निघाले तर त्याबद्दल काहीतरी बोलणे चुकीचे आहे. ऑफिसमध्ये जायचे की नाही हे देखील ते मला खरात सांगायचे. हे खूप चुकीचे आहे. श्रद्धा असते पण अंधश्रद्धा कधीही नसते असे केसरकर यांनी स्पष्ट केले.

# पेट्रोल डिझेल उत्पादन शुल्क कपात दिल्याने सरकारचं १५ दिवसांत ७ हजार कोटींचं नुकसान

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** मध्य-पूर्वेतील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतींनी उच्चांक गाठला आहे. अशा स्थितीत भारतीय ग्राहकांना महागाईपासून वाचवण्यासाठी केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लिटर १० रुपयांची कपात केली आहे. मात्र, या निर्णयामुळे सरकारी तिजोरीवर मोठा भार पडणार असून, अवघ्या १५ दिवसांत सुमारे ७००० कोटी रुपयांचा महसुली तोटा होईल, अशी माहिती सीबीआयसीचे अध्यक्ष विवेक चतुर्वेदी यांनी दिली.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 'एक्स'वर पोस्ट करत माहिती दिली की, उत्पादन शुल्कातील ही कपात ग्राहकांना जागतिक भाववाढीपासून संरक्षण देण्यासाठी करण्यात आली आहे. ''पुरवठ्यातील चढ-उतार आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींपासून नागरिकांचे रक्षण करणे हे सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे,'' असे त्या म्हणाल्या.

सरकारने देशांतर्गत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. डिझेलच्या निर्यातीवर प्रति लिटर २१.५ रुपये आणि एव्हिएशन टर्बाइन फ्युएलवर () प्रति लिटर २९.५ रुपये निर्यात शुल्क लावले आहे. या अतिरिक्त शुल्कामुळे पंधरवड्यात सरकारी तिजोरीत १५०० कोटी रुपये जमा होतील, ज्यामुळे काही प्रमाणात महसुली तोटा भरून निघण्यास मदत होईल.

केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सांगितले की, गेल्या एका महिन्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर पेट्रोल-डिझेलच्या किमती ३० ते ५० टक्क्यांनी वाढल्या आहेत. उत्तर अमेरिका, युरोप आणि आफ्रिकी देशांमध्ये इंधन प्रचंड महाग झाले आहे. जर भारताने उत्पादन शुल्कात कपात केली नसती, तर आंतरराष्ट्रीय दरांनुसार भारतात पेट्रोल २६ रुपयांनी आणि डिझेल तब्बल ८१ रुपयांनी महाग झाले असते. कच्च्या तेलाच्या किमती ७० डॉलरवरून थेट १२२ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचल्या असतानाही, भारतात इंधन दर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे, असंही पुरी म्हणाले.

सध्या दिल्लीमध्ये पेट्रोलचा दर ९४.७७ रुपये तर डिझेल ८७.६७ रुपये प्रति लिटर आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या किमती १०० डॉलर प्रति बॅरलच्या वर असतानाही, उत्पादन शुल्क कपातीमुळे भारतीय ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# बळीराजा तिहेरी संकटात; उत्तर महाराष्ट्रासाठी 'विशेष पॅकेज' द्या!; खासदार डॉ.शोभा बच्छाव यांची लोकसभेत मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** निसर्गाचा लहरीपणा, बाजारपेठेतील अस्थिरता आणि युद्धजन्य परिस्थिती अशा तिहेरी संकटात सापडलेल्या उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने 'विशेष आर्थिक पॅकेज' जाहीर करावे, अशी मागणी खासदार डॉ. शोभा बच्छाव यांनी लोकसभेत केली. शुक्रवारी कृषी विषयावरील चर्चेदरम्यान उत्तर महाराष्ट्रातील कांदा, कापूस आणि द्राक्ष उत्पादकांच्या व्यथांकडे डॉ.बच्छाव यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.

सद्यःस्थितीत उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. एका बाजूला अवकाळी पाऊस आणि गारपिटीने कंबरडे मोडले आहे, तर दुसऱ्या बाजूला कष्टाने पिकवलेल्या शेतमालाला उत्पादन खर्चाच्या तुलनेत बाजार भाव मिळत नाही. त्यातच जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे कृषी मालाची निर्यात पूर्णपणे ठप्प झाली आहे. गेल्या काही वर्षात उत्पादन खर्च २०० ते ३०० टक्क्यांनी वाढला असताना शेतकऱ्याला आपला शेतमाल कवडीमोल दराने विकावा लागत असल्याने हे शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडले आहेत.

नाशिक आणि धुळे पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर कांदा उत्पादन घेतले जाते. मात्र,उत्पादन खर्चापेक्षा कमी दरात कांदा विक्री करण्याची पाळी सध्या शेतकऱ्यांवर आली आहे, याकडे डॉ. बच्छाव यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. जागतिक स्तरावर वाहतूक खर्च वाढल्याने कांदा निर्यात करणे कठीण झाले आहे. यासाठी सरकारने वाहतूक खर्चात ५० टक्के थेट सबसिडी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. कापूस, सोयाबीन आणि मका या शेतमालांची अवस्था देखील वेगळी नाही. या शेतमालांचा भाव उत्पादन खर्चाच्या खाली गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे, असे डॉ.बच्छाव यांनी सांगितले.

अडचणीत सापडलेल्या उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी खासदार बच्छाव यांनी केंद्र सरकारकडे काही मागण्यांचा आग्रह धरला. कांद्याला हमीभाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांची मोठी अडचण होत आहे. त्यामुळे कांद्याला हमीभाव देण्यात यावा, नाशिक व धुळे जिल्ह्यात नाफेड आणि सीसीआयची खरेदी केंद्रे वाढवून द्यावीत, कापूस, सोयाबीन व मक्याची हमी भावाने १०० टक्के खरेदी




करावी,अशी मागणी त्यांनी केली.

तसेच गेल्या दोन- अडीच महिन्यांतत झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेत पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई द्यावी,युद्धजन्य परिस्थितीमुळे वाढलेला निर्यात खर्च भागविण्यासाठी ५०% अनुदान द्यावे,अशा मागण्या देखील त्यांनी केल्या.

हवामान बदल आणि अनिश्चित बाजारपेठ अशा दोन्ही आघाड्यांवर सध्या शेतकरी लढत आहेत. जर केंद्र सरकारने यात वेळीच लक्ष घातले नाही, तर उत्तर महाराष्ट्रातील ग्रामीण अर्थव्यवस्था अडचणीत येईल, असा इशाराही डॉ. बच्छाव यांनी यावेळी दिला.

# विवाहित पुरुषाचे दुसऱ्या महिलेसोबत लिव्ह-इनमध्ये राहणे गुन्हा नाही-अलाहाबाद उच्च न्यायालय

**आत्ताच एक्सप्रेस**

**अलाहाबाद –** ''एखादा विवाहित पुरुष दुसऱ्या महिलेसोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत असेल, तर तो गुन्हा मानला जाऊ शकत नाही'', असे निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. नैतिकता आणि कायदा या दोन भिन्न गोष्टी आहेत, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. लिव्ह-इनमध्ये राहणाऱ्या जोडप्याला महिलेच्या कुटुंबियांकडून मिळणाऱ्या धमकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी न्यायालयाकडून संरक्षण मागितले होते.

व्यक्तीचे लग्न झाल्यामुळे दुसऱ्या महिलेबरोबर नात्यात राहणे गुन्हा आहे, अशा शब्दात महिलेच्या कुटुंबियांनी न्यायालयात बाजू मांडली. यावर मत नोंदवताना कायदा आणि सामाजिक नैतिकता या दोन भिन्न गोष्टी असल्याचे मत न्यायालयाने नोंदवले आहे. न्यायमूर्ती जे.जे मुनीर आणि तरुण सक्सेना यांच्या खंडपीठाने याबाबत निर्णय दिला. पोलिसांनी या जोडप्याची सुरक्षेची जबाबदारी शाहजहानपूरच्या पोलिस अधीक्षकांवर सोपवली आहे.

''एखाद्या प्रौढ व्यक्तीच्या संमतीने विवाहित पुरुष लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत असल्यास यासाठी कोणताही गुन्हा नाही. नैतिकता आणि कायदा वेगळे ठेवायला हवेत. कायद्यानुसार कोणताही गुन्हा सिद्ध होत नसेल, तर नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सामाजिक मतं आणि नैतिकता न्यायालयाच्या कृतीला मार्गदर्शन करणार नाहीत,'' असे खंडपीठाने म्हटले. दरम्यान, महिलेने ती प्रौढ असून, स्वत:च्या इच्छेने लिव्ह-इनमध्ये राहत असल्याचा अर्ज शाहजहानपूर पोलिसांकडे सादर केल्याचे न्यायालयाचे म्हटले आहे.

महिलेच्या पालकांना देखील ते दोघे लिव्ह-इनमध्ये राहत असल्याची कल्पना आहे पण, त्यांनी दोघांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. पोलिसांनी या अर्जावर अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याचे न्यायालयाला आढळून आले. ''लिव्ह-इनमध्ये राहत असलेल्या दोन प्रौढ लोकांना संरक्षण देणे पोलिसांचे कर्तव्य आहे'', असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने लिव्ह-इनमध्ये राहणाऱ्या दोघांना कोणतीही इजा न पोहोचविण्यास तसेच दोघांच्या घरात प्रवेश करण्यास मनाई केली आहे.

# पेचात सापडलेले ट्रम्प

इराण पडायची चिन्हे नाहीत. दोस्तराष्ट्रे वाकुल्या दाखवत आहेत. अमेरिकेच्या काँग्रेससाठी येत्या नोव्हेंबरमध्ये मध्यावधी निवडणुका होत आहेत. ट्रम्प चोहीकडून पेचात सापडले आहेत. मस्त जगाला अभूतपूर्व तेलसंकटाच्या खाईत लोटून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प या घडीला दिशाहीन होत चाललेल्या अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण यांच्यातील युद्धातून सन्माननीय 'यशस्वी माघार' कशी घ्यावी, या पेचात सापडलेले दिसतात. देशाचे सर्वोच्च धर्मगुरू, नेते आयातुल्ला अली खामेनी यांच्यासह सर्व प्रमुख नेत्यांचे शिरकाण झालेले असताना काही दिवसांतच इराण शरण येईल, असा कयास बांधलेल्या ट्रम्प यांना अस्तित्वासाठी जिवावर उदार होऊन प्रतिहल्ले करणाऱ्या इराणने चकित केले आहे. ट्रम्प यांना धडा शिकवण्यासाठी इराणने कुवेत, अमिराती, सौदी अरेबिया, कतार, बहारीन इत्यादी अमेरिकेच्या मित्रदेशांच्या तेलशुद्धीकरण प्रकल्पांवर क्षेपणास्त्रे डागली. या तेलशुद्धीप्रकल्पाना ट्रम्प इराणच्या क्षेपणास्त्रांच्या तडाख्यातून वाचवू शकले नसल्याने आपण यापुढे अमेरिकेवर किती अवलंबून राहायचे याचाही विचार करण्याची पाळी या देशांवर आली आहे. जोडीला कतार, सौदी अरेबिया इत्यादी अनेक आखाती देशांत ट्रम्प यांचे व त्यांचे सध्या राजनैतिक मध्यस्थाची टोपी घालून फिरणारे जावईबापू जरेद कुश्नर यांचेही वैयक्तिक, व्यावसायिक, आर्थिक हितसंबंध गुंतले असल्याने ट्रम्प यांचा संताप होणे साहजिक आहे. दुसरे म्हणजे, आखाती देशांसोबतच युरोपीय 'नाटो' राष्ट्रांबाबतही (ज्यामध्ये ब्रिटन, जर्मनी व फ्रान्स आदी अमेरिकेचे दुसऱ्या महायुद्धापासूनचे पारंपरिक 'दोस्त' राष्ट्रे येतात) ट्रम्प यांचा भ्रमनिरास झाला आहे. ट्रम्प यांनी आपल्या दोन्ही कार्यकाळात 'नाटो' मित्रराष्ट्रांना कस्पटासमान लेखून युरोपच्या सुरक्षेसाठी अमेरिकेवर अवलंबून राहण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीचे वाभाडे काढले. त्यांच्या मागणीनुसार ३२ राष्ट्रांच्या या गटातील अनेक राष्ट्रांनी आपली स्वतःची संरक्षणविषयक आर्थिक तरतूद वाढविली. तरीही ट्रम्प, उपाध्यक्ष जे.डी. व्हान्स व संरक्षणमंत्री पेट हेग्सेथ यांनी युरोपीय मित्रांवरील विषारी टीका सुरूच ठेवली. 'रशिया-युक्रेन युद्ध ही युरोपची समस्या आहे.अमेरिकेने त्यात झीज का सोसावी?' असा पवित्रा घेऊन ट्रम्प यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याबाबत मवाळ धोरण स्वीकारले. 'नाटो' देश यामुळे अर्थातच दुखावले गेले होते. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या घटनेनुसार युद्धाची सुरुवात करण्याआधी काँग्रेसकडून संमती घेतली नव्हतीच; तसेच 'नाटो'मधील मित्रराष्ट्रांनाही विश्वासात घेतले नव्हते. होर्मुझ सामुद्रधनीची नाकेबंदी करून इराणने तेलसंकट निर्माण केले तेव्हा मात्र या आंतरराष्ट्रीय जलमार्गाने जाणाऱ्या तेलवाहू जहाजांचे इराणच्या क्षेपणास्त्रांपासून रक्षण करण्यासाठी ट्रम्प यांना मित्रराष्ट्रांची आठवण झाली. या राष्ट्रांनी अमेरिकेच्या जोडीला आपल्या युद्धनौका पाठवाव्यात, असे आवाहन ट्रम्प यांनी केले. ब्रिटन, फ्रान्स , जर्मनी व कॅनडा या प्रमुख दोस्तराष्ट्रांनी ट्रम्प यांची विनंती धुडकावली. जर्मनीचे चॅन्सेलर फ्रेडरिक मर्झ यांनी ट्रम्प यांना 'रशिया-युक्रेन युद्ध ही युरोपची समस्या आहे,' या त्यांच्या उद्गारांची आठवण करून दिली व, 'अमेरिका-इस्रायल व इराण यांच्यातील हे युद्ध ही युरोपची समस्या नाही' असा टोला लगावला. ट्रम्प यांनी ब्रिटनचे पंतप्रधान स्टार्मर यांना मदतीसाठी फोन केला असता, 'याबाबतचा निर्णय मला माझ्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांशी बोलून घ्यावा लागेल,' असे स्टार्मर यांनी सांगितले. स्टार्मर यांनी चतुराईने आपल्या विनंतीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या, हे न समजण्याइतके ट्रम्प दुधखुळे नाहीत. ट्रम्प हे अमेरिकेच्या शक्तिशाली लष्कराच्या कारवाईने स्वबळावर होर्मुझचा तिढा सोडवू शकतात; परंतु 'नाटो'च्या मित्रराष्ट्रांबरोबरचे अमेरिकेचे पारंपरिक सौहार्दाचे संबंध किती ताणले गेले आहेत, हे त्यांच्या ट्रम्प यांच्याशी वागतानाच्या 'जशास तसे' धोरणातून दिसते. ट्रम्प यांनी गेल्या वर्षी इफसान येथील इराणच्या अणुप्रकल्पावर महाशक्तिशाली बॉम्ब टाकून त्याचा विध्वंस केला आणि 'आता इराणची अणुबॉम्ब बनविण्याची क्षमता आम्ही पूर्णपणे नष्ट केली,' असे छाती फुगवून जाहीर केले होते. असे असताना, सध्याचे युद्ध पुकारताना 'अमेरिकेला व जगाला धोका निर्माण करणारा इराणचा अणुकार्यक्रम कायमस्वरूपी जमीनदोस्त करणे हे आपले एक उद्दिष्ट आहे', असे त्यांनी सांगितले. त्यांच्या आधीचे विधान व आत्ताचे विधान यांतील ठसठशीत विसंगती नजरेआड करता येत नाही. एकदा नष्ट केलेले इराणचे अणुप्रकल्प ट्रम्प पुन्हा जमीनदोस्त करणार म्हणजे नेमके काय, अशी चर्चा अमेरिकेतील ट्रम्प यांचे टीकाकार करीत आहेत. इराणची इस्लाम धर्माधिष्ठित, असहिष्णू, मूलतत्त्ववादी, विरोधकांना क्रूरपणे यमसदनास पाठविणारी राजवट केवळ हवाई हल्ले करून नष्ट करणे अमेरिका किंवा इस्रायलला कठीण आहे. याचे कारण इराणची राजकीय व प्रशासकीय संस्थात्मक व्यवस्था ही भक्कम पायावर उभी असून सर्वोच्च नेते आयातुल्ला खामेनी व अली लारजानीसारखा सुरक्षा प्रमुख व राजनैतिक नेता मारले गेले असताना देखील तेथे सहज खांदेपालट होऊन राजवट अद्याप कोसळलेली नाही, हे लक्षात घ्यायला हवे. या सगळ्यांत आणखी एक महत्त्वाची अशी मेख आहे. गेल्या वर्षी ट्रम्प यांनी इराणच्या आण्विक आस्थापनांवर जे हल्ले केले त्या वेळी इराणच्या अणुशास्त्रज्ञांनी व तंत्रज्ञानी सुमारे ४०० किलोग्रॅम समृद्धीकरण केलेल्या युरेनियमचा साठा दडवून ठेवला असल्याचे वृत्त अनेक विश्वसनीय सूत्रांनी दिले होते. हा साठा जोपर्यंत इराणकडे आहे तोपर्यंत इराणच्या अण्वस्त्रांचा धोका कायम राहील, असे भाष्य अमेरिकेच्या तज्ज्ञांनी केले आहे. हे युरेनियम ताब्यात घेऊन ते इराणमधून हलविणे अमेरिकेला साध्य झाले तर एका अर्थाने त्यांचे इराणच्या अण्वस्त्रबंदीचे उद्दिष्ट सफल होईल. अमेरिका एक खास सैनिक तुकडी इराणला पाठवून हा युरेनियमचा साठा शोधून ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही वृत्त अमेरिकेच्या माध्यमातून देण्यात आले आहे. प्रत्यक्षात तसे झाले तर ट्रम्प यांना इराणचा अण्वस्त्र निर्मितीचा प्रकल्प पूर्णपणे बासनात बांधल्याचे श्रेय घेता येईल. अर्थात ट्रम्प यांच्यासारखा सरड्यासारखे रंग बदलणारा व क्षणात जागतिक राजकारण व अर्थकारण घुसळून काढणारे निर्णय घेणारा बेभरवशी राजकीय नेता दुसरा नाही. दोनच दिवसापूर्वी त्यांनी 'मी आता युद्ध आवरते घेतो आहे' असे म्हटले व त्याच वेळेस अमेरिकेच्या आणखी तीन युद्धनौका व नौसैनिक मध्यपूर्वेकडे रवाना झाल्याचेही वृत्त पसरले. या सर्व गदारोळात सर्वांत खूष आहेत ते इस्रायलचे युद्धपिपासू , भ्रष्टाचाराचे आरोप असलेले पंतप्रधान नेतान्याहू. ट्रम्प यांना हाताशी धरून इराणचा संहार करण्याचे श्रेय घेऊन निवडणुकीत पुन्हा एकदा विजयी होण्याचे त्यांचे मनसुबे आकार घेऊ लागले आहेत. मात्र दुसऱ्या बाजूला अमेरिकेच्या काँग्रेससाठी येत्या नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मध्यावधी निवडणुकात ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे प्रतिनिधीगृहात असलेले बहुमत गमावण्याची चिंता पक्षधुरिणांना भेडसावते आहे. 'अमेरिका फर्स्ट'ची घोषणा देत सत्ता काबीज करणारे ट्रम्प पुन्हा जागतिक पोलिसाच्या भूमिकेत शिरले आहेत. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष मादुरो यांचे अपहरण करून त्यांना अमेरिकेत आणणारे ट्रम्प यांची वक्रदृष्टी आता ग्रीनलँडवरून कम्युनिस्ट क्युबाकडे वळली आहे. 'इराणचे युद्ध आटोपल्यावर क्युबाचा ताबा घेण्याचा माझा विचार आहे', हे त्यांनी ओव्हल ऑफिसमध्ये बसून स्मितहास्य करीत जाहीरही केले आहे! 'नासा' येत्या काही दिवसांत पुन्हा एकदा चंद्रावर मानव पाठविण्याची मोहीम हाती घेणार आहे. इकडे पृथ्वीवर सर्वशक्तिमान ट्रम्प मध्ययुगातील 'जंगल राज' कसे होते, याची प्रात्यक्षिके जगाला दाखवीत आहेत. कालाय तस्मै नमः!

# गॅस टंचाई, पॅरासीटामॉल, खत समस्या ते हेलियम – सामान्य माणसाच्या घरात पोहोचू लागलेले इराण युद्धाचे परिणाम!



इराणवर अमेरिकन, इस्रायली हल्ले सुरू होऊन आता महिना होत आला. पहिल्या ७२ तासात इराणी शिया राजवट सत्तेवरून खाली येईल आणि आपली गुलाम राजवट इराणवर येऊन आपण हा विषय मार्गी लावून मग क्युबाचा घास घ्यायला मोकळे होऊ ही ट्रम्पची योजना काही पूर्ण होताना दिसत नाही.

इराणी सैन्याने पहिल्या काही दिवसात होर्मुझ स्ट्रेट बंद केल्याने जागतिक तेल पुरवठा विस्कळीत झाला आहे. आता इराण सध्या काही देशांची जहाजे आणि तेल टँकर्स प्रत्येकी २ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजे सुमारे १८ कोटी रुपये घेऊन काही देशांची जहाजे होर्मुझ स्ट्रेट मधून जाऊ देत आहे त्यात भारतीय जहाजे सुद्धा आहेत. होर्मुझच्या आत आणि बाहेर सुमारे साडे तीन हजार जहाजे, टँकर्स अडकून पडले आहेत. आजपर्यंत इराणी सैन्याला न जुमानता बाहेर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या २० जहाजांवर इराणी सैन्याने मिसाईल किंवा ड्रोन डागून ती जाळल्याने कुणीही या धाडसात उतरायला तयार नाही.

**सामान्य माणसाच्या आयुष्यावर याचे परिणाम काय?**

जागतिक तेल पुरवठ्याच्या विस्कळीत होण्याने फक्त पेट्रोल डिझेलची टंचाई निर्माण होईल अशी सगळ्यांची धारणा असते. परंतु आधुनिक जगात क्रूड तेलापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांनी आणि वस्तूंनी इतक्या प्रमाणात घुसखोरी केलेली आहे की क्रूड पुरवठा बंद म्हणजे सामान्य माणसाचं आयुष्य ठप्प अशी स्थिती आहे. काल भारतीय संसदेत पंतप्रधान मोदी यांनी याची लॉकडाऊन सोबत केलेली तुलना ही ह्या टोकाच्या क्रूड अवलंबनामुळेच आहे.

याचे दूरगामी परिणाम लक्षात ठेवले आणि आपल्याला नेमक्या काय अडचणी येऊ शकतात हे बघितलं तर येणारे काही महिने आपण काळजी घेऊ शकतो.

१. गॅस तुटवडा : कतरच्या रास लफ्फान गॅस टर्मिनल वर झालेल्या इराणी हल्ल्यात मोठ्या नुकसानामुळे भारताच्या ४७% गॅस पुरवठ्यावर थेट परिणाम झाला आहे. यामुळे गॅसवर आधारित सगळे उद्योग अडचणीत आहेत. कोळशाला पर्याय म्हणून, प्रदूषण विरहित आणि वापरायला सोपा म्हणून एलपीजी गॅस कित्येक उद्योगात एकमेव इंधन स्रोत म्हणून वापरला जातो. याच्या पुरवठ्यात व्यत्यय आल्याने होणारी अडचण आता समोर येऊ लागली आहे.

रेस्टॉरंट आणि तयार अन्न उद्योगाला याचा सर्वाधिक फटका बसला आहे. याचा थेट परिणाम येणाऱ्या काळात फ ूड होम डिलिव्हरी उद्योगावर होईल. यात लक्षावधी लोक डिलिव्हरी चेनमध्ये राहून रोजगार कमावतात ते याने बेरोजगार होतील.

जगातील क्रमांक २ चे सिरॅमिक उत्पादन हब गुजरातच्या मोर्बी मध्ये विकसित झालेलं आहे. इथे देशातील ९०% टाईल्स उत्पादन होतं आणि यात ९ लाखाच्या आसपास माणसे काम करतात.इथे वार्षिक ५०,००० कोटींची उलाढाल होते पैकी १८,००० कोटींची निर्यात होते. युद्ध सुरू झाल्यापासून इथल्या ५०० कारखान्यांनी काम बंद केलं आहे कारण सध्या फक्त घरगुती गॅस पुरवठा ही सरकारची प्राथमिकता आहे. याचा परिणाम काही काळानंतर रिअल इस्टेट मधील रोजगारावर होईल कारण घर, फ्लॅट बांधून झाला तरी अंतर्गत कामे टाईल्स नसल्याने खोळंबतील.

काचेच्या बाटल्या आणि गृहोपयोगी वस्तूंच्या भट्ट्या मोठ्या प्रमाणात गॅस वापरतात. या भट्ट्या बंद करून परत चालू करण्यात मोठा वेळ जातो आणि परत सुरू करताना नुकसान होऊ शकतं. बाटल्यांचा पुरवठा खंडित किंवा विस्कळीत झाला की दारू, औषधे पॅकिंग साठी वापरल्या जाणाऱ्या बाटल्या महाग होणार किंवा अपुऱ्या पुरवठ्यामुळे अडचणी निर्माण होणार. याला पर्याय म्हणून प्लास्टिक बाटल्यांचा पर्याय बघावा तर तो ही पेट्रोलियम पदार्थांपासून बनतो त्यामुळे त्यातही अडचण आहेच.

२. पेट्रोकेमिकलवर आधारित औषध उद्योग : कित्येक आधुनिक औषधे पेट्रोकमिकल पासून बनतात. त्यामुळे त्याच्या अपुऱ्या पुरवठ्याचा परिणाम औषध उत्पादनावर होणं स्वाभाविक आहे. अनेक औषधात जवळपास सगळे इंग्रेडिएंट पेट्रोकेमिकल मधून येतात.

आपण रोजच्या आयुष्यात सगळ्यात जास्त वापरतो ते औषध म्हणजे पॅरासिटामॉल ते फिनॉलपासून तयार होतं. आयबुप्रोफेन हे वेदनाशामक आयसोब्युटिल्बेन्झिन आणि प्रोपियोनिक ॲसिडपासून तयार होतं. डायबेटिक पेशंट रक्तातील साखर कमी करण्यासाठी वापरतात ते मेटफॉर्मिन ८० ते ९०% पेट्रोकेमिकल आधारित असतं. याशिवाय अन्य औषधांसाठी लागणारा ९९ टक्के कच्चा माल पेट्रोकेमिकलपासून येतो. प्लास्टिक बनवणारे क्रॅकर्स बंद झाले की औषधांचा कच्चा मालही उपलब्ध व्हायचा बंद होतो.

होर्मुझ स्ट्रेट मधून औषध निर्मितीसाठी लागणारा नॅफ्था जगभरात पोचतो, ती सध्या बंद आहे. नॅफ्था हा औषध उद्योगात सॉल्व्हेंट म्हणून वापरतात आणि ॲक्टिव्ह इंग्रेडियंट वेगळा करण्यासाठी त्याचा उपयोग होतो. भारत हा जगातील जेनेरिक औषधांचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. जगाच्या २० टक्के आणि अमेरिकेच्या ४० टक्के गरजा भारत पूर्ण करतो. पण सध्या पुरवठ्यातील व्यत्ययामुळे हा उद्योग संकटात आहे. कमी पुरवठ्यामुळे सरकारने घरगुती गॅस पुरवठ्याला प्राधान्य दिल्याने उद्योगांना मिळणाऱ्या पेट्रोकेमिकल उत्पादनांची टंचाई निर्माण झाली आहे.

भारतातील सीरम इन्स्टिट्यूट सारख्या संस्था जगाला ४०-५०% लसी पुरवते, त्याही याच पेट्रोकेमिकल पदार्थांवर अवलंबून आहेत. लसीच्या बाटल्या, सिरिंज, पॅकेजिंग मधील अत्यंत उच्च दर्जाचं विशेष ग्रेडचं प्लास्टिक आणि लसीमधील घटकही पेट्रोकेमिकलवर आधारित आहेत. त्यामुळे याच्या उत्पादन खर्चात वाढ आणि उपलब्धतेत घट होऊ घातली आहे.

३. खते आणि कृषी उत्पादन : जागतिक रासायनिक खतांच्या उत्पादनात अरब देश आणि इराणचा वाटा २०% आहे पण युरिया उत्पादनात हा वाटा ४६% आहे. भारत, ब्राझील, चीन हे अरब देशांचे मोठे ग्राहक आहेत. भारत आपल्या वार्षिक गरजेच्या ५०% युरिया अरब देशातून घेतो. शिवाय अमोनियम नायट्रेट सारखी अन्य खते अरब देशातून येतात. आज रशियाने खतांच्या निर्यातीवर बंदी घालण्याची घोषणा केल्याने भारतासाठी आगामी काळात वाढलेल्या दराने खते विकत घ्यावी लागतील. शिवाय कमी खतांमुळे देशातील अन्न उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. खतांच्या वाढलेल्या दरांमुळे आणि अपुऱ्या पुरवठ्यामुळे जगभरात अन्नाच्या टंचाईची शक्यता आत्ताच बोलून दाखवली जात आहे. अन्न टंचाई आणि राजकीय स्थिरता याचा जवळचा संबंध आहे. ज्या ज्या देशात अन्न टंचाई निर्माण होते आणि महागाई वाढते त्या त्या देशात सत्ताधारी पक्षांना आंदोलने आणि हिंसाचाराचा सामना करावा लागतो असा इतिहास आहे यामुळे आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेत याने बरीच राजकीय वादळे येऊ घातली आहेत.

४. सल्फर टंचाई : अरब देशांचा सल्फर उत्पादनात ५०% जागतिक वाटा आहे. जवळपास सर्व रिफायनरी इराणी हल्ल्यांनी प्रभावित झालेल्या आहेत किंवा होर्मुझ स्ट्रेट बंद असल्याने तयार उत्पादन जागतिक बाजारात जायला रस्ता उपलब्ध नाही. याचा परिणाम सल्फर आधारित खतांच्या पुरवठ्यावर झाला आहे, शिवाय याचे दर ५०% नी वाढले आहेत. सेमीकंडक्टर उद्योगात अत्यंत शुद्ध सल्फ्युरिक ॲसिड सिलिकॉन वेफर्सच्या उत्पादन प्रक्रियेत वापरलं जातं. त्याच्या टंचाईने ही प्रक्रिया धीमी पडत आहे. शिवाय इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरी उद्योगात कॉपर, निकेल, कोबाल्ट उत्पादनात सल्फ्युरिक ॲसिड अत्यावश्यक असल्याने सर्व ईव्ही उत्पादक कंपन्या सध्या चिंतेत आहेत. याचा परिणाम सरसकट सगळ्या बॅटरी उद्योगावर होणार आहे.

५. हेलियम शॉक आणि डिजिटल उद्योग : नैसर्गिक वायू प्रक्रियेदरम्यान उप-उत्पादन म्हणून हेलियम काढला जातो. जेव्हा एलएनजी उत्पादन थांबते, तेव्हा हेलियमचा पुरवठा बंद होतो. कतारमधील रास लाफान कॉम्प्लेक्सवर झालेल्या हल्ल्यांनंतर हेलियम उत्पादन ठप्पा आहे. इथे जगातील सर्वात जास्त हेलियम उत्पादन होतं.जागतिक पुरवठ्यापैकी सुमारे ३० ते ३६ टक्के भाग इथून पुरवला जातो. रास लफ्फान उत्पादन क्षमता कमी होणे अधिक लॉजिस्टिकच्या अडचणींमुळे हे संकट अधिक गंभीर झालं आहे. हॉर्मुझची स्ट्रेट पाश्चात्य जहाजांसाठी बंद झाल्यामुळे, हेलियमचे कंटेनर्स आखाती देशांत अडकून पडले आहेत. द्रव हेलियम क्रायोजेनिक स्टोरेजमध्ये असूनही सतत बाष्पीभूत होत असतो. जर हे कंटेनर अंदाजे ४५ दिवसांच्या आत हलवले गेले नाहीत, तर गॅस टँकर्स मधील मोठा भाग कायमचा नष्ट होतो. याचा परिणाम बाजारात आधीच दिसत असून, अति-शुद्ध हेलियमच्या किमती दोन आठवड्यांत दुप्पट झाल्या आहेत.वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत महत्वाची एमआरआय स्कॅनिंग मशिन्स मधून निर्माण होणाऱ्या इमेज मध्ये स्पष्टता येण्यासाठी त्या मशीनमध्ये मॅग्नेट सतत गार रहावी लागतात. त्यासाठी अत्यंत कमी तापमान राहणं अतिशय आवश्यक असतं, ही फक्त हेलियम मुळे साध्य होतं. त्यामुळे हेलियम तुटवड्याचा यावर लगेच परिणाम होणार आहे.


तात्काळ आणि गंभीर परिणाम पूर्व आशियातील सेमीकंडक्टर उद्योगावर होत आहे. सेमीकंडक्टर बनवण्याच्या प्रक्रियेत हेलियम अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. सेमीकंडक्टर मधील वेफर्स थंड करण्यासाठी याचा वापर होतो. शिवाय व्हॅक्यूम सिस्टममध्ये गळती तपासण्यासाठी हे हेलियमला अन्य पर्याय उपलब्ध नाही. ५ नॅनोमीटरपेक्षा कमी असलेल्या चिप्समध्ये निर्माण प्रक्रियेत थोडी जरी उष्णता निर्माण झाली तरी उत्पादनात मोठी घट होऊ शकते किंवा उत्पादन पूर्णपणे थांबू शकते. दक्षिण कोरिया मधील चिप उद्योग यामुळे सध्या यामुळे याच संकटात आहे. कारण कोरिया आपल्या गरजेच्या दोन-तृतीयांश हेलियम कतारमधून आयात करतो. सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स आणि एसके हायनिक्स सारख्या कंपन्यांनी, ज्या एआय एक्सिलेटरसाठी आवश्यक असलेल्या हाय-बँडविड्थ मेमरी पुरवठ्यात जगात आघाडीवर आहेत, त्यांनी आधीच हेलियम वाचवण्यासाठी पावले उचलायची सुरुवात केली आहे. २०२६ मध्ये यामुळे डिजिटल उपकरणे, विशेषतः मोबाईल हँडसेट, लॅपटॉप, टॅब्लेट सह सैनिकी आणि नागरी उपयोगाची ड्रोन यांच्यासह सध्या बोलबाला असलेलं एआय तंत्रज्ञान यांना कमी उत्पादन आणि वाढलेला खर्च अशा दुहेरी संकटांचा सामना करावा लागेल.

६. अल्युमिनियम टंचाई आणि बियर, सॉफ्ट ड्रिंक, मेडिकल उपकरणे आणि पॅकिंग उद्योग : बहरीन अल्युमिनियम कंपनी अल्बा ही जगातली एक प्रमुख अल्युमिनियम कंपनी आहे आणि जगातली सर्वात मोठी सिंगल साईट स्मेल्टिंग फॅसिलिटी म्हणून ओळखली जाते. इराणी हल्ल्याने या कंपनीने आपली तीन युनिट बंद केल्याने जागतिक पुरवठ्यात व्यत्यय आला त्यामुळे बियर आणि सॉफ्ट ड्रिंक कॅनचे दर वाढत आहेत. या पेयांना लागणाऱ्या काचेच्या बाटल्या सुद्धा गॅसच्या कमतरतेमुळे महाग झाल्या आहेत. याचा परिणाम ह्या पेयांची पॅकेजिंग २० ते ४०% महाग होण्यात होणार आहे. शिवाय औषध उद्योगात असलेली सर्जिकल उपकरणे, फॉइल्स आणि अन्नपदार्थ पॅकेजिंग मधील अल्युमिनियम वापराचे दरही महागणार आहेत. याचा एकाच वेळी अनेक उद्योगांवर परिणाम होणार आहे.

पेट्रोल, डिझेलची टंचाई आणि वाढलेले उद्योग हे दैनंदिन जीवनातील प्रत्येक गोष्टीच्या किमतीवर परिणाम करणार आहेत. अजून भारतात म्हणावे तसे दर वाढलेले नाहीत पण लवकरच ते वाढतील. जेट फ्युएल दर वाढणार आहेतच त्यामुळे विमान प्रवास महाग होईल. अन्नधान्य, भाजीपाला, दूध, शिक्षण, रोजगार यात इंधन दरवाढ मोठा परिणाम करणार आहे. प्लास्टिक टंचाई आणि महाग प्लॅस्टिक मुळे पॅकेजिंग महाग होईल याने ईकॉमर्स कंपन्या, तयार अन्नाची होम डिलिव्हरी यांना दणका बसेल. गृहउद्योग, लघु उद्योग यात सर्वाधिक फटका खातील. भारताच्या कानाकोपऱ्यात फोफावलेला घरगुती पर्यटन उद्योग, बांधकाम उद्योग हा सुद्धा मोठ्या संकटात जाईल. यामुळे सामूहिक शहाणपणा आणि खबरदारी याची गरज निर्माण झालेली आहे. सरकारने कोरोना समस्येची आठवण करून देण्याच्या मागे हेच मोठं कारण आहे कारण लांबलेलं युद्ध आपल्याला कदाचित कोरोना विसरायला लावेल इतका काळ आणि त्यापेक्षा मोठ्या अडचणी निर्माण करू शकते!

**– विनय जोशी,**
आयसीआरआर – संघर्ष संशोधन
आणि निराकरण संस्था

# बदलत्या काळात कलेचे नवे रंगमंच



काळ बदलला असं सरार्ससपणे बोललं जातं. पण काळ बदलला म्हणजे काय झालं? तर याचं नेमकं उत्तर संदर्भातल्या विषयानुसार तसं तसं दिलं जातं. पण जर कलेबाबत बोलायचं झालं तर १९२० सालचा नाट्यमन्वतराचा काळ आठवत असेलच. ज्याचं वर्णन कुसुमाग्रजांनी असं केलं होतं की, मराठी संगीत रंगभूमीच्या उद्धवस्त धर्मशाळेत संध्याकाळचा दिवा लावायला ही कुणी नाही अशी परिस्थिती झालेली होती, अशा काळामध्ये त्यावेळच्या समाजाला आवडेल, रुचतील अशी नाटकं आली आणि एक नाट्यमन्वतर घडलं.

फार इतिहासात जात नाही. मात्र काळानुसार कला नाही तर सादरीकरणात बदल झाले आणि आपण समाज म्हणूनही ते स्वीकारतही गेलो. काळाच्या हातात हात घालून कला चालते याची प्रचिती दरवेळी अधोरेखित होते. कोणी कितीही म्हणू दे पण, बदल ही काळाची आणि कलेची गरज आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

उदाहरण जर द्यायचं झालं रेडिओ, दूरदर्शन, मोबाईलमध्ये जसे बदल झाले, होत आहेत त्याचप्रमाणे भजन, कीर्तन, गाण्याच्या, कवितांच्या, नाटकाच्या, लोककलेच्या सादरीकरणाला जुन्यासोबत नवा साजही चढला. जेव्हा नवीन पिढीकडे वारसा सुपूर्द केला जातो असं सांगितलं जातं, पण प्रत्यक्षात तो खरंच दिला जातो का? तर अगदी कागदोपत्री ती काही रिटारमेंट वगैरे नसते, तर कलाकार त्याच्यातली कला नव्यानं सादर करतो आणि त्यात समरसून जातो.

पूर्वी कलेच्या सादरीकरणासाठी नाट्यगृहे, जत्रा, कीर्तनमंच, लोकनाट्यांची रंगमंचे हीच प्रमुख माध्यमे होती. आज त्यांची जागा पूर्णपणे बदलली नसली तरी त्यासोबत डिजिटल मंचांची भर पडली आहे. त्यामुळे कलेचा विस्तार अधिक व्यापक झाला आहे.

गेल्या काही काळात फेसबूक, इन्स्टाग्राम जी सध्या लोकप्रिय समाज माध्यमं म्हणून ओळखली जातात, त्यावर आपण रिल्स व्हीडिओ पाहतो. त्यावर लोककला सादर करणारं फोक अख्यान, लोक आख्यान याची चर्चा, व्हीडिओज् आपण मोठ्याप्रमाणात पाहिले असतील, काही जणांनी तो कार्यक्रम प्रत्यक्षही अनुभवला आहे. यातील कलाकारांनी जी वाद्य, जी पद्ये आपली ठेवीतली होती पण मागे पडत होती, काही ठराविक भागातच सादर केली जात होती, ती शिकून घेऊन, सादर करायला सुरुवात केली आणि लोककलेला नवीसंजीवनी मिळाली अशी प्रतिक्रिया समाजातून लोकांनी द्यायला सुरुवात केली.

अगदी याचप्रमाणे ओपन माईक कार्यक्रम ज्यात तुम्ही केवळ तुम्हाला जी कला येते ती सादर करावी मग त्यात काहीही असो, कथा, कविता, गीत, नृत्य, नाट्य असा एक बुकेच असतो असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. इतकंच नव्हे तर पार्कातल्या कविता, छोट्या छोट्या संहिता लिहून त्याची नाट्यछटा किंवा चित्रकथा म्हणजेच रील्स तयार करणं असेल त्यातून काय नेमका संदेश पोहोचवायचा असतो तो पोहोचवला जातो. अशी कित्येक उदाहरणं देता येतील की असे कितीतरी प्रयोग कलेच्या प्रत्येक आयामात सुरु आहेत आणि निरंतर सुरु राहतील.

विद्यार्थी, तरुण, काही प्रमाणात ज्येष्ठ मंडळीसुद्धा याला पसंती देताना दिसून येते. नवनवीन मंच तयार होतात, त्यातून कलेचे विविध प्रकार सादरही केले जातात. कलेविषयी समाजात कालही सजगता होती, आजही आहे आणि उद्याही राहिल यात तीळमात्र शंका नाही. बदल आपण स्वीकारलेला असला असं जरी आपण म्हणत असलो तरी याच कलेच्या मंचावरून, कलेचा वापर करुन काही समाजकंटक नको त्या गोष्टीही करत असल्याची उदाहरणं आपण पाहिली आहेत. फार त्या खोलात जाण्याची गरज नाही, मात्र जे चिरंतन असतं ते टिकतं, यात लोकसहभाग, समाजाचा सहभाग असतोच, कारण समाज, कला आणि कलेतून संस्कृती टिकवणं हे कलाकाराचं कार्य आणि भान असायलाच हवं.

बदलत्या काळात कलेच्या सादरीकरणाला नवी व्यासपीठे मिळत आहेत आणि त्यातून कलाकारांना आपली कला अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचवण्याची संधीही मिळत आहे. मात्र या नव्या मंचांचा स्वीकार करताना परंपरेची मुळं जपत कलेचा आशय आणि संस्कृतीची जाण जपणं तितकंच महत्त्वाचं आहे. कारण कला ही केवळ मनोरंजनापुरती मर्यादित नसून समाजमन घडवण्याची आणि संस्कृती जपण्याची प्रभावी शक्ती आहे. म्हणूनच बदलत्या काळाशी सुसंगत राहून कलेला नवे आयाम देणं आणि त्याचवेळी तिची मूल्यं टिकवणं हीच खरी कलाकारांची जबाबदारी आहे. कारण कला ही केवळ मनोरंजनाचं साधन नसून समाजमन घडवण्याची प्रभावी शक्ती आहे. कारण कला टिकली तर संस्कृती टिकते आणि संस्कृतीच्या आधारावर देशाची ऐक्यताही!

**– दीपक पळसुले**

# हिंगोलीत श्रीराम जन्मोत्सवाचा जयघोष; छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक लघु नाट्यने उपस्थितांची मने जिंकले



**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि सकल हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात भव्य श्रीराम जन्म महोत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. शहरातील मुख्य केंद्र असलेल्या महावीर चौक परिसरात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रभू श्रीरामाच्या जयघोषाने आणि शिवरायांच्या शौर्यगाथेने संपूर्ण शहर राममय झाले होते.

**शिवरायांच्या नाटिकेने आणला अंगावर शहारा**

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील भव्य ऐतिहासिक नाटिका. स्थानिक कलाकार राजू लोखंडे आणि त्यांच्या संचाने सादर केलेल्या या दमदार अभिनयाने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. कलाकारांच्या जिवंत अभिनयामुळे उपस्थित नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. नागरिकांकडून या कलेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

महंत आणि साधू-संतांची वंदनीय उपस्थिती

कार्यक्रमाला आध्यात्मिक अधिष्ठान लाभले ते शहराच्या परिसरातील विविध मंदिरांच्या महंतांच्या उपस्थितीमुळे. यामध्ये प्रामुख्याने: श्री श्री १००८ स्वामी गंगा आनंद जी सरस्वती (चिंचोली महादेव मंदिर ) श्री श्री १००८ सच्चिदानंद सरस्वती महाराज (त्रिंबकेश्वर) श्री महंत तेजेखरानंद सरस्वती महाराज (चिंचोली महादेव मंदिर) भगवानजी महाराज (खटकाळी हनुमान मंदिर) विजय जी महाराज (बद्रीनारायण मंदिर) प्रदीप धडवाई (धडवाई हनुमान मंदिर) यांच्यासह अनेक साधू-संतांनी उपस्थित राहून आशीर्वाद दिले. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्याला होती त्यामध्ये हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे पाटील, माजी आमदार गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्यासह सुधीर सराफ, विश्व हिंदू परिषद जिल्हा अध्यक्ष डॉक्टर मुरलीधर तोष्णीवाल उपाध्यक्ष सावरमल अग्रवाल , महेश बियाणी, गोकुळ बंडाळे, जिल्हा मंत्री ज्ञानेश महाराज, शशिकांत वडकुते, ओमप्रकाश हेडा, दीपक निमोनिया, दीपक कागडीवाल, डॉ. किसन लखमावार, या मान्यवरांची उपस्थिती होती.

महोत्सव यशस्वी करण्यासाठी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि आयोजक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मोठी मेहनत घेतली. यामध्ये राजेंद्र हलवाई, कैलास श्रीनाथ, रमाकांत मिस्किन, गजानन ठाकूर,अरुण कहर, कैलास सुतारे, अंकुश हनवते, शिवा देवकते, नामदेव मस्के, केशव सुरदुसे, शिवकुमार सूर्यवंशी, चेतन भुसांडे, अविनाश श्रीनाथ, सचिन परसवाले, विजय शिंदे, रितेश जाधव, शुभम श्रीवास राहुल श्रीवास, आशिष कुरीलआदींचा समावेश होता. सूत्रसंचालन ईश्वर प्रजापति यांनी केले.

या कार्यक्रमाला हिंगोली शहर व परिसरातील महिला, पुरुष आणि बालके मोठ्या संख्येने उपस्थित होती. या भव्य आयोजनामुळे संपूर्ण शहरात चैतन्याचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले असून, सर्वत्र श्रीराम जन्मोत्सवाचा मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

## चुकून दुसऱ्या फोन पे ला गेलेले ८० हजार सायबर सेल हिंगोलीच्या प्रयत्नामुळे तात्काळ परत मिळाले

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–**दिनांक २६ मार्च २०२६ रोजी फिर्यादी इसम नामे अशोक सूर्यभान लठाड वय ४५ रा जांब ता पातुर जिल्हा अकोला यांनी आपल्या आईचे उपचार कामी वर्धा येथे त्यांच्या भावाच्या फोन पे नंबर वर ८० हजार रुपये पाठवले परंतु फोन पे मोबाईल नंबरचा एक नंबर चुकल्यामुळे सदरचे ८० हजार हे ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर परिसरातील एका महिलेच्या अकाउंट वर गेले.

सदरची चूक कळल्यानंतर फिर्यादी अशोक लठाड यांनी सदर महिलेला संपर्क केले असता सदर महिलेने मोबाईल नंबर स्विच ऑफ करून कोणताही प्रतिसाद दिला नाही.

त्यानंतर तक्रारदार यांनी सायबर सेल हिंगोली येथे येऊन घटनाक्रम सांगितला असता सपोनि घेवारे यांनी सदर मोबाईलचे डिटेल्स घेतले असता सदरची महिलाही ठाणे जिल्ह्यातील कल्याण उल्हासनगर परिसरातील असल्याचे निष्पन्न झाले.

सायबर सेल हिंगोली ने कल्याण तालुका पोलीस स्टेशन येथे संपर्क साधून सपोनि दत्तात्र्य नलावडे कल्याण तालुका पोलीस स्टेशन यांच्यामार्फतीने उल्हासनगर येथील सदर महिलेचा पत्ता मिळवला व चुकून गेलेले ८० हजार रुपये तात्काळ परत करा अन्यथा कायदेशीर गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्याबाबत बजावले असता सदर महिलेच्या नातेवाईकांनी तक्रारदार अशोक लठाड यांचे ८० हजार रुपये तात्काळ परत केले.

आईच्या हॉस्पिटलच्या कामासाठी पाठवलेले पैसे अचानक दुसऱ्या अकाउंट वर गेले व ज्यांच्या अकाउंट वर गेले त्यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने तक्रारदार अशोक लठाड यांच्यासमोर आईच्या उपचाराचा प्रश्न निर्माण झाला होता परंतु सायबर सेलच्या मदतीने तक्रारदार यांचे पैसे तात्काळ परत मिळून दिल्याने तक्रारदार अशोक लठाड यांनी हिंगोली पोलीसांचे आभार मानले.

सदरची कार्यवाही डॉ. नीलाभ रोहन, पोलीस अधीक्षक हिंगोली, कमलेश मीना अप्पर पोलीस अधीक्षक हिंगोली मोहन भोसले स्थागुशा यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे पोलीस अंमलदार प्रदीप झुंगरे, मारुती काकडे, प्रणिता मोरे यांनी केली.



**नांदेड नाका येथे असलेली घडी मोठी कमान आज आलेल्या वाऱ्यामुळे रस्त्यावरील दुभाजकावर पडली . वाऱ्यामुळे कमान दुभाजक वर पडली त्यामुळे कुठलीही हानी झाली नाही परंतु ही कमान रस्त्यावरील येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांवर पडली असती तर नक्कीच अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नव्हती.**

# हिंगोली जिल्ह्यात इंधन पुरवठा सुरळीत, विक्रीवरील निर्बंध आदेश रद्द

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असूनही समाजमाध्यमांवर पसरलेल्या अफवांमुळे नागरिकांकडून पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी होत असल्याने तात्पुरता मागणी-पुरवठा यात असमतोल निर्माण झाला होता.

या पार्श्वभूमीवर सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व इंधनाचा सुरळीत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गुरुवार (दि. २६) रोजी पेट्रोल व डिझेल विक्रीवर मर्यादा घालण्याचा आदेश पारित करण्यात आला होता.




मात्र, सद्यस्थितीत बीपीसीएल, आयओसीएल आणि एचपीसीएल तसेच इतर कंपन्यांकडून आवश्यक तेवढा इंधनसाठा जिल्ह्यात उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे इंधन वितरणावरील निर्बंधाची आवश्यकता उरलेली नाही.

यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाने तो (दि.२६) रोजीचा आदेश तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात येत असल्याचे प्रशासनाने कळविले आहे.

दरम्यान आज जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी कांबळे, जिल्हा पुरवठा अधिकारी पाटील यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी जिल्ह्यातील इंधनाच्या संदर्भात माहिती दिली. त्यामध्ये खालील प्रमाणे पेट्रोल व डिझेलचा साठा हिंगोली जिल्ह्यात उपलब्ध असल्याचे यावेळी सांगितले. पेट्रोल ३८८ के.एल. डिझेल ५७४ के. एल. ३०५३ एल.पी. जी. सिलेंडर ५५०० एल.पी.जी. बुकिंग २४४ कमर्शियल गॅस ६०, के.एल. केरोसीन आले आहे.

# माहिती अधिकारात मागितलेली माहिती देण्यास टाळाटाळ; वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

*** आत्ताच एक्सप्रेस**

**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर शहरातील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय या ना त्या कारणाने सतत चर्चेत राहत असून विकास कामातील भ्रष्टाचारा पाठोपाठ आता नागरिकांनी माहिती अधिकारात मागितलेली माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याने नागरिकांनी अपील करण्यापेक्षा माहिती द्या अन्यथा उपोषणास बसू असा इशारा दिल्याने वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे



माहूर शहरातील भाजपाचे तरुण तडफदार कार्यकर्ते पवन चव्हाण यांनी दि २१.१ २०२६ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाला लागून असलेल्या सुरू असलेल्या वन उद्यानाच्या कामाबद्दल माहिती मागितली होती अनेक वेळा अपील दाखल करूनही माहिती देण्यात आली नाही या प्रकरणी अधिक चौकशी केली असता येथील लेखापाल सहा ते सात महिन्यापासून कार्यालयातच आले नाहीत अशी माहिती मिळाली

त्यामुळे पवन चव्हाण यांनी कार्यालयात अर्ज देऊन अपील दाखल केले असून जर माहूरच्या कार्यालयाने माहिती दिली नाही तर येथे पुढील कार्यालयात अपील दाखल न करता येथेच उपोषणास बसून माहिती मिळवून घेऊ असा इशारा त्यांनी निवेदनावर द्वारे दिल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला असून शेकडो अर्ज धुळखात पडल्याने नागरिक येथे चकरा मारताना दिसत आहेत.

## मारहाण व धमकीप्रकरणी गुन्हा दाखल; चौघांवर कारवाई

*** आत्ताच एक्सप्रेस**

**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** तालुक्यातील पेंदा नागढवं शेत परिसरात जुन्या वादातून झालेल्या भांडणात मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि.१४ मार्च २०२६ रोजी सकाळी सुमारे ०८.३० वाजण्याच्या सुमारास किनवटपासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या शेतात ही घटना घडली. फिर्यादी राजेश्वर इजारे (वय २७ वर्षे, रा. पार्डी , ता. किनवट हे आपल्या शेतात असताना आरोपींनी त्यांच्याशी वाद घातला.

या प्रकरणातील आरोपींमध्ये (१) शिवाजी बोइनवाड, (२) अशोक बोइनवाड, (३) बाबू बोइनवाड व (४) सुभाष बोइनवाड (सर्व रा. पार्डी , ता. किनवट) यांचा समावेश आहे. आरोपींनी जुन्या वैरातून फिर्यादीला शिवीगाळ करत हाताने व चप्पलने मारहाण केली. तसेच ''तुला जिवंत ठेवणार नाही'' अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या घटनेत फिर्यादीला दुखापत झाली असून, घटनेमागे पूर्वी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीचा राग असल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६१/२०२६ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ११५(२), ३५२, ३५१(२) तसेच ३(५) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार सिद्धार्थ वाघमारे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

## जिल्हास्तर क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली** – जिल्हास्तर क्रीडा प्रतिभा विकास केंद्र, हिंगोली कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने खेळाडू निवड चाचणीचे आयोजन करण्यात येणार असून शूटिंग (नेमबाजी) व मैदानी क्रीडा प्रकारांसाठी ही निवड चाचणी दि.१० एप्रिल २०२६ रोजी घेण्यात येणार आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्फत 'मिशन लक्ष्यवेध योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत रायफल व पिस्टल शूटिंग (नेमबाजी) तसेच मैदानी क्रीडा प्रकारांसाठी तालुका क्रीडा संकुल, हिंगोली येथे जिल्हास्तर क्रीडा प्रतिभा विकास केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. या केंद्रात निवड झालेल्या खेळाडूंना निवासी/अनिवासी स्वरूपात दर्जेदार क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, अल्पोपहार सुविधा तसेच क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील पात्र व गुणवंत खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ही निवड प्रक्रिया राबविण्यात येत असून इच्छुक खेळाडूंनी आपले आवेदनपत्र आवश्यक कागदपत्रांसह दि. ६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत सादर करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक डॉ. निलकंठ श्रावण यांच्याशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.



**हिंगोली येथे सकल हिंदू समाजातर्फे घेण्यात आलेल्या महाआरतीला सर्वच राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थिती लावली होती.**

# 'वाचनाची गोडी वाढवा, पुस्तकाला मित्र बनवा' मुंबई शहर जिल्हा ग्रंथोत्सव उद्घाटन समारंभात मान्यवरांचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** ज्ञान, संस्कार आणि प्रेरणा देणारे प्रत्येक पुस्तक आपल्याला काहीतरी नवीन शिकवते. पुस्तकांशी मैत्री केल्यास कधीच एकटे वाटत नाही. वाचनाची सवय आपल्याला आयुष्यभर साथ देणारी आणि यशाच्या मार्गावर पुढे नेणारी असल्याने विद्यार्थ्यांसह सर्वांनीच वाचनात गोडी वाढवून पुस्तकाला मित्र बनवावे, असे आवाहन मुंबई शहर जिल्हा ग्रंथोत्सवच्या उद्घाटन समारंभात मान्यवरांनी केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग ग्रंथालय संचालनालय जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय मुंबई शहर आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय दादर (पूर्व) मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय येथे दोन दिवशी मुंबई शहर ग्रंथोत्सव-२०२५ आयोजन करण्यात आले आहे.

या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन लेखक, चित्रकार व ज्येष्ठ पत्रकार प्रकाश बाळ जोशी यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी शशिकांत काकड, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे प्रमुख कार्यवाह रवींद्र गावडे, बृहन्मुंबई जिल्हा ग्रंथालय संघाच्या अध्यक्ष सुचिता मोरे, बृहन्मुंबई दक्षिण विभाग कार्यालयाच्या शिक्षण निरीक्षक डॉ. वैशाली वीर, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या कार्याध्यक्ष शीतल करदेकर, उमा नाबर यांच्यासह साहित्यप्रेमी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



वाचन ही केवळ माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून ती मनाला समृद्ध करणारी आणि विचारांना नवी दिशा देणारे एक ऊर्जा स्त्रोत असल्याने लहानपणापासूनच विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासावी, असे सांगत लेखक प्रकाश बाळ जोशी म्हणाले, ग्रंथालयाने वाचनाचा वारसा जतन केला आहे. ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यास मदत होईल. सकाळी ग्रंथदिंडीमध्ये असलेला मुलांचा सहभाग, त्यांचा उत्साह मनाला भारावून टाकणारा होता, असे गौरवोद्गारही त्यांनी यावेळी काढले.

प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर म्हणाले, राज्यात ११ हजारावर शासन मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालये आहेत. या ग्रंथालयांच्या माध्यमातून वाचन संस्कृती अधिक वृद्धींगत होत आहे. राज्य शासनामार्फत दरवर्षी जिल्हास्तरावर ग्रंथोत्सव आयोजित करून वाचन संस्कृतीला अधिक बळ दिले जात आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर येथे आयोजित ग्रंथोत्सवातील ग्रंथदालनांचा लाभ नागरिक व वाचकांनी घ्यावा. विद्यार्थ्यांनी स्क्रीन टाइमिंगपासून थोडे बाजूला होऊन पुस्तकांना मित्र बनवावे असे शिक्षण निरीक्षक डॉ. वैशाली वीर यांनी यावेळी म्हणाल्या. तर मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे प्रमुख कार्यवाह रवींद्र गावडे यांनी राज्य शासनाने मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयास पुस्तकांचे डिजिटलायझेशन करण्यासाठी पाच कोटीचा निधी मंजूर केला असल्याचे सांगितले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी शशिकांत काकड यांनी ग्रंथोत्सवातील दोन दिवसात होणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती प्रास्तविकात दिली. ग्रंथोत्सव हा वाचन संस्कृतीचा उत्सव असून दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथोत्सव व पुस्तक प्रदर्शनास भेट देऊन एक तरी पुस्तक खरेदी करून वाचक, साहित्यप्रेमी आणि विद्यार्थ्यांनी ग्रंथोत्सवाचा मनमुराद आस्वाद घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. तत्पूर्वी ग्रंथदिंडी काढण्यात आली. या ग्रंथ दिंडीमध्ये ज्ञानेश्वर विद्यालय, दिगंबर पाटकर विद्यालय, राजा शिवाजी विद्यालय, सोशल सर्विस लीग विद्यालय, आर. एम. भट हायस्कूल, शिशुविहार माध्यमिक विद्यालय, गुरु नानक विद्यालय, बंगाली एज्युकेशन स्कूल, बालमोहन विद्यामंदिर आणि कीर्ती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ग्रंथदिंडीत सहभागी झालेल्या शाळांचा मान्यवरांच्या हस्ते पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

# जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर दामपुरीचा किरण सोशल मीडियावर चमकला; ३७ हजार फॉलोअर्ससह नेटकऱ्यांच्या पसंतीस!

✱ आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

नांदेड – ''लोक काय म्हणतील?'' या विचाराने अनेकजण आपली स्वप्ने सोडून देतात. मात्र, परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील दामपुरी येथील एका सामान्य कुटुंबातील तरुण, किरण अरुण नागरगोजे याने परिस्थितीवर मात करत सोशल मीडियाच्या जगात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शिक्षण केवळ बारावीपर्यंत झालेले असतानाही, केवळ कलेच्या जोरावर तो आज हजारो लोकांच्या चेहऱ्यावर हसू फुलवत आहे.



**संघर्षातून यशाकडे वाटचाल**

किरणची घरची परिस्थिती बेताचीच आहे. ग्रामीण भागात राहून काहीतरी वेगळं करण्याचं त्याने ठरवलं तेव्हा सुरुवातीला गावकऱ्यांनी त्याची टर उडवली. ''हा काय करणार?'' असे टोमणे त्याला ऐकावे लागले. मात्र, लोकांच्या बोलण्याकडे लक्ष न देता, स्वतःच्या कलेवर विश्वास ठेवून किरणने सोशल मीडियावर व्हिडिओ बनवण्यास सुरुवात केली.

**मार्गदर्शक आणि कुटुंबाची साथ**

किरणच्या या प्रवासात त्याला खऱ्या अर्थाने दिशा मिळाली ती प्रसिद्ध व्याख्याते विठ्ठल कांगणे सर यांच्यामुळे. कांगणे सरांनी किरणमधील सुप्त गुण ओळखून त्याला मोठा पाठिंबा दिला. आज कांगणे सरांच्या रीलमध्ये किरण आपल्या अभिनयाने लाखो लोकांना हसवण्याचे काम करत आहे. याशिवाय, त्याचा मोठा भाऊ भागवत नागरगोजे यानेही संकटाच्या काळात किरणला खंबीर साथ दिली, ज्यामुळे तो खचून न जाता आपले काम सातत्याने करत राहिला.

**यशाचा टप्पा: ३७ हजार फॉलोअर्स**

कधीकाळी ज्याच्या कामावर लोक हसायचे, आज त्याच किरणच्या कामाचे कौतुक करण्यासाठी सोशल मीडियावर ३७,००० पेक्षा जास्त फॉलोअर्स जोडले गेले आहेत. विठ्ठल कांगणे सरांसोबतचे त्याचे व्हिडिओ लाखो लोकांपर्यंत पोहोचत असून, अल्पावधीतच तो एक सोशल मीडिया स्टार म्हणून नावारूपास आला आहे.

''परिस्थिती कशीही असली तरी जिद्द सोडायची नाही. लोकांनी नाव ठेवली तरी चालेल, पण आपण आपलं काम प्रामाणिकपणे केलं की यश नक्कीच मिळतं. मला आनंद आहे की मी लोकांच्या हसण्याचं कारण बनत आहे.''

**किरण अरुण नागरगोजे**

सामान्यातील सामान्य तरुणही जर मनाशी ठरवलं तर सोशल मीडियाच्या माध्यमातून स्वतःचं विश्व निर्माण करू शकतो, हेच किरणने आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे. त्याच्या या यशाबद्दल दामपुरी परिसरातून आणि सोशल मीडियावरून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# दिशा दोष असल्याने किनवट तहसिलचे दार कायम बंद

✱ आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**



**किनवट** – पुरोगामी महाराष्ट्रात बुवाबाजीचे प्रमाण अत्यंत वाढले आहे. किनवट तहसील कार्यालयाच्या नवीन इमारतीचे मुख्य द्वार आज पर्यंत उघडले नसल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बांधकाम पूर्ण होऊनही बरीच वर्षे ही इमारत बंदच होती. इमारत बांधकामात वास्तुदोष असल्याने बराच काळ इमारत बंद ठेवण्यात आली होती. तत्कालीन प्रभारी असलेल्या तहसीलदाराने मोठ्या हिमतीने इमारत ताब्यात घेऊन कारभार सुरू केला पण त्यांची सेवा संपत आल्याने ते अल्पकालीन ठरले. त्यानंतर आलेल्या कोणत्याही तहसीलदाराने अपशकूनाच्या भीतीने पश्चिम दिशेचा दरवाजा उघडलाच नाही. कुण्या तरी नामवंत बाबा ने हा दरवाजा न उघडण्याचा सल्ला दिल्याचे ऐकीवात आहे. या सल्ल्यामागे नाशिक कनेक्शन असल्याचे बोलल्या जात आहे. खरंतर मुख्य बाजाराच्या दिशेने असलेला दरवाजा बंद ठेवल्यामुळे आलेल्या लोकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सर्व इमारतीला पायपीट करावी लागत आहे. या कार्यालयात वयोवृद्ध, दिव्यांग, अबाल व महिला मोठ्या संख्येने हेलपाटे मारत असतात. वेळेवर कोणताच अधिकारी उपस्थित नसतो आणि वरून बाजाराच्या दिशेने असलेला दरवाजा बंद असल्याने अधिकची पायपीट करावी लागते.

हा दरवाजा तात्काळ उघडा करावा अन्यथा या दारासमोर आंदोलन करण्याचा इशारा शरद जोशी प्रणित शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश कदम पाटील यांनी दिला आहे. यावेळी श्रीनिवास अण्णा जमादार, दादाराव डोंगरे व त्रिभुवनसिंग ठाकूर उपस्थित होते.

# उमरीत कर थकबाकीदारांवर कठोर कारवाईचा इशारा; १ एप्रिलपासून दरमहा २% शास्ती

✱ आत्ताच एक्सप्रेस
**सुमन पोलशेटवार**



**उमरी** – शहरातील मालमत्ता कर व इतर कर थकबाकीदारांविरुद्ध उमरी नगरपरिषदेकडून कठोर भूमिका घेण्यात आली असून, ३१ मार्च २०२६ पूर्वी कर न भरल्यास १ एप्रिल २०२६ पासून दरमहा २ टक्के शास्ती आकारण्यात येणार असल्याचा इशारा मुख्याधिकारी गणेश चाटे यांनी दिला आहे. नगरपरिषद प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, शहरातील सर्व मालमत्ता धारकांनी आपापला मालमत्ता कर व इतर कर नियोजित मुदतीत भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मुदत संपल्यानंतर थकबाकीदारांकडून प्रति महिना २ टक्के दराने शास्ती आकारली जाणार असून, वर्षभरात ही शास्ती २४ टक्क्यांपर्यंत जाऊ शकते. याशिवाय, कर न भरलेल्या मालमत्ता धारकांविरुद्ध जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे. तसेच संबंधितांची नळ कनेक्शनही बंद करण्याची कठोर पावले उचलली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा आर्थिक तोटा टाळण्यासाठी आपला थकित कर त्वरित उमरी नगरपरिषदेकडे जमा करावा, असे आवाहन मुख्याधिकारी गणेश चाटे यांनी केले आहे. नगरपरिषदेकडून कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. दरम्यान, शहराच्या विकासकामांसाठी कर वसुली अत्यंत महत्त्वाची असल्याने नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# श्रीराम जन्मोत्सव व हिंदू एकता दिवस निमित्त देगलूर शहरात शोभायात्रा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर** – दरवर्षीप्रमाणे यावर्षीही देगलूर शहरातून भव्यदिव्य शोभायात्रा काढण्यात आली या शोभायात्रेचे आयोजन श्रीराम जन्मोत्सव समिती, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल देगलूर तर्फे करण्यात आले होते,

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक बालाजी झेंडा लाईन गल्ली परिसरातून गेल्या १४ वर्षांपासून निरंतन भव्य दिव्य शोभायात्रा काढण्यात येते त्याच अनुषंगाने

यावर्षी सुद्धा श्रीराम जन्मोत्सव निमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली या शोभायात्रेची सुरुवात माजी उप नगराध्यक्ष व नगराध्यक्षांचे प्रतिनिधी बालाजीराव टेकाळे यांच्या हस्ते प्रभू श्रीराम जी व सीतामाता यांच्या मूर्तीची पूजा करून करण्यात आली..




या वेळी विश्व हिंदू परिषदेचे गिरीश वजलवार, गिरीश गोळे, भाजप नेते राजेश महाराज देगलूरकर, दीपक शहाणे, माजी नगराध्यक्ष शंकर कंतेवार, माजी सरपंच मंगल पाटील देगावकर, शिवसेना उ.बा.ठा. चे महेश पाटील, माजी नगराध्यक्ष नंदकिशोर दाशेटवार, मनसेचे प्रवीण मंगनाळे, शिवसेनेचे व्यंकट पुरमवार, संजय अचिंतलवार, मनोज तोटावार, बालाजी मैलगिरे, राष्ट्रवादीचे नगरसेवक अनिल बोनलावार, सुमित कांबळे, माजी नगरसेवक शैलेश उल्लेवार, काँग्रेस बालाजी थडके, राष्ट्रवादी चे शहराध्यक्ष देवेंद्र मोतेवार, पोलिस निरीक्षक मारोती मुंडे, भगवान जाधव, मुकुंद भुताळे, माधव पाटील पाळेकर, राजू पाटील मलकापूरकर, उमाकांत मुंडकर, गंगाधर मामीडवार, अशोक घाटे, सौरव मधुरवार, भावना दाशेटवार, भीमराव जोगावार, बालाजी अडेपवार, राजू कुऱ्हाडे, धनाजी जोशी, बस्वराज पंचडे, ज्ञानेश्वर सावळे उपस्थित होते .

तर नर्मदेश्वर महादेव मंदिर येथे रामदास पाटील सुमठानकर, नगरसेवक अविनाश निलमवार, नगरसेवक बालाजीराव रोयलावार, नगरसेवक लालू कोयलावार, नगरसेवक लक्ष्मण कंधारकर, नगरसेवक सुनील रेशमवार, राजू मालेगावकर, चंदन मंडलेवार, यादव गोरलावार, दत्तू जोशी, दिलीप मालेगावकर, शिवाजी रोयलावार, यांनी यात्रेचे स्वागत केले व मूर्तिपूजा केले. या शोभायात्रा मार्गामध्ये श्री नरेश दरबस्तवार मित्र परिवार यांच्या तर्फे खिचडी व जिलेबी चा महाप्रसाद, विलास नोमुलवार यांच्या तर्फे पाणी वाटप चे आयोजन करण्यात आले होते, जनरल स्टोअर्स तर्फे मठ्ठा चे आयोजन करण्यात आले होते,

देगलूर नगरपरिषद तर्फे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, माजी सैनिक संघ तर्फे खिचडी चा प्रसाद ठेवण्यात आले, गंगाराम सेठ मिसाळे यांनी भक्तांना ५०० समोसे नाश्त्यासाठी उपलब्ध करून दिले. शहरातील मुख्य बाजारातून ढोल ताशांचा गजरात वाजत गाजत शोभायात्रा संपन्न झाली. श्रीकांत भिलोंडे, दत्ता टाकले यांनी ईरवंत माठवाले, समीरन वजलवार कृष्णा कदम, संतोष फुलारी, नितीन भंडरवार, नरेश बेजगमवार, प्रदीप सक्करगे, सुनील मनसक्कर्गे, प्रवीण पुलगमवार, प्रवीण चैनपुरकर यांना सोबत घेऊन कार्यक्रम यशस्वी केले. माजी सरपंच सुरेश मिसाळे यांनी सर्वांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या तर प्रशांत दासरवार कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# सवना ज. येथील ॲटोचालकाचा मुलगा नवोदय परीक्षेत जिल्ह्यात तिसरा

## पेरकेवाड समाजातर्फे सुरज अनगुलवारच्या यशाबद्दल केला सत्कार




**आत्ताच एक्सप्रेस**

**हिमायतनगर** – तालुक्यातील सवना ज.येथील केंद्रीय प्राथमिक शाळेतील होतकरू विद्यार्थी सुरज देविदास अनगुलवार याने नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत जिल्ह्यात तिसरा क्रमांक पटकावून शाळा, गाव व तालुक्याचे नाव उज्वल केले आहे .सुरज हा ॲटोचालक देवीदास अनगुलवारचा मुलगा असून आई ही गृहणी आहे. या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरावरून अभिनंदन केले जात आहे.

शिक्षण घेतांना कमी वयात लग्न झाल्याने शिक्षणाची इच्छा राहून गेली.आपलं स्वप्न लेकराचा माध्यमातून पूर्ण करण्यासाठी आईने कष्ट घेतले.सुरज हा पहिल्या वर्गापासूनच हुशार व चुनूकदार मुलगा आहे. त्याचा गणित व बुद्धीमापन चाचणी आवडता विषय आहे .सुभाषराव गायकवाड यांच्याकडून जूनी पुस्तके सुरजला मिळाली व मार्गदर्शन मिळाल्याने सुरजने झपाटून अभ्यास करून पेपर सोडविले.आई रात्रीला १० वाजे पर्यत अभ्यासाला बसवत असे .अत्यंत साध्या,गरीब परिस्थितीत शिक्षण घेत असतानाही सुरजने आपल्या कष्ट, चिकाटी आणि प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर हे यश मिळवले आहे.

सुरजच्या यशामागे त्याचे आई-वडिलांचे त्याग व प्रोत्साहन तसेच शाळेतील शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शिक्षकांनी वेळोवेळी विशेष मार्गदर्शन, सराव परीक्षा व अभ्यासाचे योग्य नियोजन करून त्याला सक्षम दिशा दिली. स्वतः च्या सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर सुरजने यश मिळविले आहे . मराठवाड्यातील पेरकेवाड समाज बांधवाकडून नवोदय परीक्षेत जिल्हयातून तिसरा येणाऱ्या सुरज अनगुलवार चा यांचा सत्कार शाल, पुष्पहाराने सुभाष गायकवाड , ग्राम पंचायत सदस्य गजानन गोपेवाड , विनोद राऊत , सेवानिवृत मुख्याध्यापक ए .आर . अनगुलवार आदिने केला.यावेळी मनोगत सुभाषराव गायकवाड , सेवानिवृत मुख्याध्यापक ए.आर.अनगुलार ने केले .यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सतीश गोपतवाड यांनी सुत्रसंचलन केले तर हावगीराव पाटील यांनी अभार मानले.या प्रसंगी सर्वे विद्यार्थी व काही पालक हजर होते.कार्यक्रमासाठी मालोजी शिंदे ,मनोहर शितळे,रेखा कदम,विजयश्री भोसले आदी शिक्षक कर्मचारी यांनी परिश्रम घेतले .

# विजड्म इंग्लिश स्कूलचे 'उमंग उत्सव २०२५-२६' वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

✱ आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**नांदेड** – नांदेड शहरातील डॉ.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह येथे दि.२४ मार्च २०२६ रोजी विजड्म इंग्लिश स्कूलचे 'उमंग उत्सव २०२५-२६' वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाले.या कार्यक्रमाला विद्यार्थी,पालक,शिक्षक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेव्हरंट करण सारखी,संस्था संचालक प्रा.बी.जी.घोडके,सौ.सत्यभामा बी. घोडके,राजकुमार बी.घोडके हे होते,प्रारंभी दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.त्यानंतर स्वागत गीत झाले.तसेच यावेळी उपस्थित मान्यवर मंडळींचा यथोचित सन्मान सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक नृत्यांनी उपस्थितांची मने जिंकली.देशभक्तीपर नृत्य, समूहगीत,लघुनाटिका,पारंपरिक वेशभूषा सादरीकरण यांना विशेष दाद मिळाली.या स्नेहसंमेलनासाठी नगरसेविका सौ. मिनलताई पाटील, सुदर्शन शिंदे,शिवाजी उमाटे (जिल्हा अध्यक्ष मेस्टा),मिलिंद सूर्यवंशी,संतोष संगेवार,शेखर राजगोरे,शिवा गोरे,कैलास निलावर,महेश कुंटूरकर,गजानन मस्के,बलवंत सूर्यवंशी,संजय मोरे,प्रमोद इंगळे, आणी यांच्यासह आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती लाभली होती. मान्यवरांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांचे कौतुक करताना अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कला, गुण आणि आत्मविश्वासाला चालना मिळते,असे मत व्यक्त केले. शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत शिक्षकांचेही अभिनंदन करण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी ओलंपियाड परीक्षेमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना नगरसेविका मिनलताई पाटील यांच्या हस्ते पारितोषिक व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनिता मॅम,उषा मॅम, अनुराधा घोडके मॅम,गौरवी घोडके,करुणा घोडके,दीपक पवार,राजु टोम्पे व नियोजन रवी घोडके,सतीश नरवाडे शाळेचे सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले.विद्यार्थ्यांच्या रंगतदार सादरीकरणामुळे 'उमंग उत्सव-२०२६' स्नेहसंमेलन संस्मरणीय ठरले.



# माहूर शहरात महिला मंडळाच्या पुढाकाराने रामनवमी निमित्त भव्य शोभायात्रा

✱ आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर** – रामनवमी निमित्त महिला मंडळाच्या पुढाकाराने दि. २६ रोजी माहूर शहरात ''जय श्रीराम''च्या जयघोषात भव्य शोभायात्रा उत्साहात काढण्यात आली. कपिलेश्वर महादेव मंदिर येथून मिरवणुकीला प्रारंभ होऊन शिवाजी चौक मार्गे श्रीराम मंदिर येथे अंबादास जोशी वेदशाळेतील मुलांनी राम रक्षा म्हणून प्रभू श्रीराम ची आरती करून भगवान श्रीरामांच्या जन्म सोहळ्याने यात्रेचा समारोप करण्यात आला.



या शोभायात्रेत लहान मुलांनी आकर्षक वेशभूषा परिधान करून विविध देखावे सादर केले. यावेळी मुलांना शालेय साहित्य भेट देण्यात आले. शहरात ठिकठिकाणी उभारलेल्या भगव्या कमानी, पताका आणि झेंड्यांमुळे वातावरण पूर्णतः भक्तिमय झाले होते. भगवा पेहराव परिधान करून मोठ्या संख्येने रामभक्तांनी सहभाग नोंदवला.

रामनवमी उत्सव समितीत सुरेखा तळनकर, स्वाती आडे, अश्विनी गोपु महामुने, पत्रकार सौ.पद्मा गीरे ,जयश्री कान्नव,शितल केदार, रेणुका कांण्णव, अंजली काण्णव, असावरी देव , उन्नति केदार, सारिका देशपांडे ,सुवर्णा काण्णव, सुजाता कपाळे जयश्री काण्णव,लता कदम, अक्षर आम्ले, दिपाली पवार, दिपाली कांण्णव ,छाया बेलखोडे वृषाली देशपांडे चित्रा देशपांडे पत्रकार सौ.पद्मा गीरे, नम्रता देशपांडे, वृषाली देशपांडे, सुमन पसपूलवार, अल्का देशपांडे,मीरा सूर्यवंशी यांच्यासह स्वामी समर्थ भजनी मंडळाचे सुरेश शिंदे, शारदासुत खामणकर, राजू इंगोले, तुकाराम इंगोले आदींचा पुढाकार होता. शहरात युवा वर्गाकडून श्रीराम नवमी निमित्त मिरवणूक काढण्यात आली होती

या मिरवणूकित हजारो भाविकांनी सहभाग घेतला यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ ※ **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813